शुक्रवार, दि. ७ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २१६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

# ...वैयक्तिक स्वार्थासाठी समृद्धी मार्गाची दिशा आणि सीमा बदलली


## शेतकरी, कारखाना सभासद, कामगारांचे नुकसान; सीमा व दिशा पुर्व नियोजनानुसार करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** वैयक्तिक स्वार्थासाठी जालना-नांदेड नियोजित समृद्धी महामार्गाची दिशा आणि सीमा बदलण्यात आली असल्याचा गंभीर आरोप जालना सहकारी साखर कारखाना बचाव कृती समितीच्यावतीने गुरुवार (दि ६) रोजी येथे केला आहे. ते एका हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी नारायण वाढेकर, अरुण वझरकर, लक्ष्मण शिंदे, प्रल्हाद हेकाडे यांची उपस्थिती होती. यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांना जानेवारी २०२५ मध्ये निवेदन दिलेले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना सहकारी साखर कारखाना बचाव कृती समितीतील ९ हजार शेतकरी सभासद, २ हजार कामगार, एक हजार हंगामी कामगार हे नियोजित समृद्धी महामार्गामुळे गंभीररित्या बाधित होत आहेत. हा साखर कारखाना नऊ हजार शेतकऱ्यांनी स्वकष्टाने उभा केलेला आहे. जेव्हा पाच रुपये रोजनदारी होती त्या काळात सात कोटी रुपये भाग भांडवल जमा करुन आमच्या जमिनी अत्यल्प दरात कारखान्यासाठी देऊन कारखाना उभा करण्यात आला होता. हा कारखाना १९८३ ते २००० पर्यंत चांगल्या स्थितीत व नफ्यात सुरु होता. नंतर हा कारखाना विद्यमान आमदार आणि माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांचे बंधू संजय खोतकर आणि अभिमन्यू खोतकर यांच्या संचालक मंडळ असलेल्या अर्जुन शुगर इंडस्ट्रीज या कंपनीने विकत घेतला. आमदार खोतकर व माजी आमदार चव्हाण यांच्या वर्चस्वाखाली कारखाना आल्यापासून त्याची अधोगती सूरु झाली. आता हा कारखाना सक्तवसुली संचालनालय (ईडी) यांच्या कार्यवाही अंतर्गत ताब्यात असल्याने आणि या संपूर्ण व्यवहाराचे सध्या मुंबई सेशन कोर्ट येथे सुनावणी प्रलंबित आहे. जालना नांदेड नियोजित समृद्धी महामार्गाचे साखर कारखाना हद्दीतून, मालमत्तेवरून या मार्गाचे रेखांकन करण्यात आले आहे. हा महामार्ग साखर कारखान्यातून न जाता पूर्वी केलेल्या सर्वेक्षणानुसार व्हावा अशी शेतकरी व सभासदांची मागणी आहे. कुठलेही सबळ कारण नसतांना केवळ वैयक्तिक स्वार्थापोटी मार्गाची दिशा आणि सिमा बदलण्यात आल्या आहेत, आमदार अर्जुनराव खोतकर, संजय खोतकर, माजी आ. अरविंद चव्हाण यांना वैयक्तिक लाभ करुन घेण्यासाठी हे बदल केले असल्याचा आरोप निवेदनातून केलेला आहे.

बदनापूर व जालना या दोन तालुक्यातील शेतकरी, सभासद, कामगार, मजूर, व्यापारी, दुकानदार, बँका यांचे यामुळे नुकसान होणार आहे. शासनाचेही आर्थिक नुकसान आहे. ३ ते ४ किलोमिटरचे अंतर वाढल्याने वेळ, पैसा, इंधन यांचा व्यय होणार आहे. तसेच या मार्गावर दोन नवीन उड्डाणपुलांचे निर्माण करावे लागणार आहे. त्यामुळे देखील अतिरिक्त भार शासनाच्या तिजोरीवर पडणार आहे. शासनाला कोटींचे नुकसान होणार आहे.

यापुर्वीदेखील तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याबाबत निवेदन देण्यात आले असून आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आल्याचे सांगतांना या गंभीर



विषयाची तात्काळ दखल घ्यावी व नियोजित नांदेड जालना समृद्धी महामार्गाची सीमा व दिशा पुर्व नियोजनानुसार करण्यात यावी, अशी मागणी यावेळी त्यांनी केली आहे.

## ग्रामपंचायती व अशासकीय संस्थांना आवाहन

**जालना -** जिल्हास्तरीय समितीची जलयुक्त शिवार अभियान, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० व गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण या योजनेचा सुधारीत आराखडा तयार करण्यासाठी इच्छुक असलेल्या ग्रामपंचायतींनी त्यांचे ठराव व अशासकीय संस्थांनी त्यांचे प्रस्ताव दि. १३ मार्च २०२५ पर्यंत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जालना येथे सादर करावेत.

# ज्ञानराधा मल्टीस्टेट मधील सर्वसामान्य लोकांचे पैसे परत कधी करणार ?

## आमदार बबनराव लोणीकरांचा सरकारला सवाल

### सर्वसामान्यांना पैसे परत करण्याचा सरकारचा प्रयत्न राज्यमंत्री भोयर यांचे विधिमंडळात उत्तर

**मुंबई । प्रतिनिधी -** ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीच्या जालना छत्रपती संभाजीनगर परभणी हिंगोली लातूर धाराशिव बीड यासह राज्यभरातील विविध शाखांमध्ये अनेक ठेवीदार व खातेदार यांनी अनेक वर्षांपासून एफ.डी. स्वरूपात तसेच बचत खात्यावर सोने तारण स्वरूपात तसेच रोख रक्कम ठेवलेली आहे. परंतु ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या तथाकथित घोटाळ्या दरम्यान महाराष्ट्रभरातील सर्व शाखा एकाच वेळी बंद पडल्या असून सर्वसामान्य नागरिक मात्र यामुळे प्रचंड त्रस्त आहेत. या सर्व सर्वसामान्यांनी गोरगरीब नागरिकांचे अडकलेले पैसे सरकार परत कधी करणार असा सवाल आज विधिमंडळात आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित केला.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये लक्षवेधीच्या माध्यमातून आमदार बबनराव लोणीकर यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट या पतसंस्थेच्या संदर्भात सर्वसामान्य गोरगरीब लोकांच्या अडकलेल्या पैशाचा प्रश्न सरकार समोर उपस्थित केला. यासंदर्भात पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, ज्ञानराधा मल्टीस्टेट पतसंस्थेच्या वतीने २३% पेक्षा अधिक व्याज देण्याचे अमिष



सर्वसामान्य लोकांना दाखवण्यात आले. व्यापारी, शेतकरी व शेतमजूर यांच्यासह सर्वसामान्य जनतेने मुलीच्या लग्नासाठी अथवा इतर महत्त्वपूर्ण बाबींसाठी रोख रक्कम वा सोने सदरील पतसंस्थेत ठेवले. मागील वर्षभरापासून महाराष्ट्रातील ज्ञानराधा मल्टीस्टेट पतसंस्थेच्या सर्व शाखा बंद आहेत, या पतसंस्थेचे अध्यक्ष, संचालक मंडळ व कर्मचारी यांनी ठेकेदार व खातेदारांचे पैसे वा सोने परत केलेले नाही. या पतसंस्थेच्या महाराष्ट्रातील सर्व शाखा बंद असल्यामुळे व अध्यक्षांसह संचालक मंडळाला अटक झालेली असल्यामुळे संबंधित गोरगरीब लोकांचा पतसंस्थेमध्ये ठेवण्यात आलेला ऐवज देण्यास टाळाटाळ केली जात आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या या कृतीमुळे बीड व जालना पोलिसांनी या प्रकरणात ठेवीदाराचे पैसे देण्यास कसूर केल्याबाबत गुन्हा नोंदवून ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीच्या अध्यक्षासह इतरांना अटक करण्यात आली त्यामुळे सदरहू ठेवीदार व खातेदार आर्थिक संकटात सापडले असून याबाबत ठेकेदार व खातेदार यांना न्याय मिळवून देणेसंबंधी शासनाने योग्य ती कारवाई करणे अपेक्षित आहे. या घोटाळ्यात लाखो ठेवीदारांना कोट्यवधी पान २ वर

## शिक्षक समृद्धी प्रशिक्षणातून शिक्षकांचे सक्षमीकरण - गटशिक्षणाधिकारी शिंदे

### शिक्षक समृद्धी प्रशिक्षण; तिसऱ्या टप्प्याचे समारोप



**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यात शिक्षक समृद्धी प्रशिक्षण सुरू आहे. नुकतेच तिसऱ्याच टप्प्याचे समारोप पार पडला, या समारोप प्रसंगी जाफराबाद तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सतीश शिंदे हे समारोपप्रसंगी शिक्षकांना संबोधित करत होते. त्यांनी शिक्षकांना नवीन शैक्षणिक धोरणातील महत्त्वाचे टप्पे समजावून सांगत असतानाच शिक्षक सक्षमीकरण, शिक्षक समृद्धीकरण, शिक्षकांचे अपडेशन, यावर भाष्य करताना शिक्षक हा प्रशिक्षणातून समृद्ध होत असतो सक्षमीकरण होत असते हे आवर्जून उल्लेख करून सांगितले. जाफराबाद तालुक्यांमध्ये शिक्षक समृद्धीकरण प्रशिक्षण टप्प्याटप्प्याने परिपूर्ण होत आहे. या प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्ताराधिकारी फलांनी सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन पवार सर, राज्यतज्ञ प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, डॉक्टर आनंदराव जाधव, दत्ता गवळी, गटसाधन केंद्र चे प्रमुख तथा तज्ञ मार्गदर्शक नारायण पिंपळे, प्रशिक्षण प्रमुख वसंतराव शेवाळे, पान २ वर

युवा आदर्श

### पोडियम ...

व्यासपीठावर उभा
पोडियम आवडतो
शोभिवंत आकर्षक
जरा देतो सवड तो
लटपट करती पाय
सहज सारे दडवतो
वेळमारून न्यायला
वेळ जरासा दवडतो
स्वच्छ प्रकाश झोत
इकडे जास्त पडतो
प्रकाशांत ये वक्तृत्व
चांगला वक्ता घडतो
इकडे उभे राहण्यांस
प्रत्येक जण झगडतो
सन्मान लाभतो भला
भले असूदे दगड तो
कॅमेऱ्यांच्या दृष्टिक्षेपे
परिसर संपूर्ण वेढतो
लक्ष केंद्रित एकजागे
श्रोते भावना छेडतो
समारंभ झाल्यावरी
एकटा कुठेतर पडतो
अन्य सभा येई पावेतो
एक शिलेदार लढतो

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# भाजपाने जनादेश खरेदी केला

## कुणाल चौधरी यांचा गंभीर आरोप

### महायुतीचे सरकार जाती धर्मात दरी निर्माण करत आहे; दोन दिवसीय सद्भावना पदयात्रा

**जालना । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीत भाजपाला मिळालेला विजय हा खरेदी केलेला असून त्यांनी जनादेश विकत घेतला असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्याचे प्रभारी कुणाली चौधरी यांनी केला आहे. पाच वर्षांत जेवढे नविन मतदार वाढत नाहीत तेवढे अवघ्या चार-पाच महिन्यात कसे वाढतात असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.


खा. कल्याण काळे यांच्या कार्यालयात गुरुवार (दि ६) रोजी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी खा. कल्याण काळे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, राजाभाऊ देशमुख, श्री मुंडे, राजेंद्र राख आदींची उपस्थिती होती.

**सद्भावना यात्रेत जनता ताकद दाखवेल**

काँग्रेसचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या संकल्पनेतून येत्या ८ व ९ मार्च रोजी सद्भावना पदयात्रा काढण्यात येणार असून या पदयात्रेत वीस ते पंचवीस हजारांवर जनता सहभागी होणार असल्याचा दावा करत या यात्रेत जनता ताकद दाखवेल असा विश्वास महाराष्ट्र राज्य प्रभारी काँग्रेसचे सचिव कुणाल चौधरी यांनी व्यक्त केला.

श्री चौधरी म्हणाले की, राज्यात झालेल्या निवडणुकांमध्ये जनादेश खरेदी करुन जिंकल्या गेल्या आहेत. याबाबत काँग्रेस वेगवेगळ्या पद्धतीने काम करत असून याचा खुलासा आगामी काळात करणार आहे. शिर्डी येथील एका परिवारात सहा हजार मते कशी होती? असा प्रश्न उपस्थित करत याचे उत्तर मुख्यमंत्री फडणवीसांनी द्यावे असेही त्यांनी यावेळी म्हटले

निवडणुकीपुर्वी आश्वासने द्यायची व नंतर त्याला कारणे दाखवून पूर्ण न करण्याची निती भाजपाची आहे. लाडक्या बहिणींना निवडणुकीपुर्वी कोणत्याही अटींशिवाय पंधराशे रुपये लागू केले. निवडणुकीत



आश्वासन दिले पंधराशेचे दोन हजार शंभर रुपये करण्यात येतील मात्र, हे आश्वासनच राहिले. लाखो लाडक्या बहिणींना या ना त्या कारणांनी बाहेर काढले जात असल्याचे म्हणतांनाच श्री चौधरी यांनी अठरा वर्षाखालील, ६५ वर्षांवरील लाडकी बहिण नाही का? ज्यांच्या कडे ट्रॅक्टर आहे ती लाडकी बहिण नाही का? टॅक्स भरणाऱ्या लाडक्या बहिणी नाहीत का? असा प्रश्न सरकारला विचारला आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे काय झाले? युवकांचा रोजगार कुठयं? भाजपाने केवळ आश्वासने देण्याचे काम निवडणुक काळात केले. भाजपा नगर पंचायत, महानगर पालिका आदींच्या निवडणुका घेत नाही. ही संतांची भुमी आहे. सद्भावतेचा संदेश देणारा महाराष्ट्र आहे.

महायुती भाजपाचे सरकार हे जाती धर्मात दरी निर्माण करण्याचे काम करत आहे. अत्याचार, खून प्रकरणात त्यांच्याच पक्षातील लोकं त्या मागे निघताहेत. धनंजय मुंडे यांनी उशिराने राजीनामा दिल्याबाबतही त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्ला चढवला. मुख्यमंत्र्यांचे इंटेलिजियन्स डिपार्टमेंट कडे माहिती नाही का? पान २ वर

संपादकीय पान

# नियम पाळा अपघात टाळा!

गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. २०20 ते २०२४ या काळात राज्यातील ४५ पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १ लाख ५९ हजार रस्ते अपघात झाले असून त्यात ७१ हजार लोकांचा मृत्यू झाला आणि लाखो लोक गंभीर जखमी झाले आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. तीन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# सरकारने बदलले पासपोर्टचे नियम

आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी पासपोर्ट हा आपल्या नागरिकत्वाचा आणि वैयक्तिक माहितीचा महत्त्वाचा दस्तऐवज मानला जातो. अन्य देशांत प्रवास करण्यासाठी पासपोर्ट अनिवार्य असतो. परराष्ट्र मंत्रालयाकडून पासपोर्ट दिला जातो. नुकतेच केंद्र सरकारने पासपोर्टच्या नियमांमध्ये बदल केले आहेत. पासपोर्ट नियम, १९८0 या नियमावलीत या आठवड्यात बदल करण्यात आले आहेत. नवीन नियम अधिकृत राजपत्रात प्रकाशित झाल्यानंतर लागू होतील.

पासपोर्टसाठी नवीन नियम काय आहेत?

जन्म दाखला

केंद्र सरकारच्या सुधारित नियमांनुसार आता १ ऑक्टोबर २०२३ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तींना पासपोर्टसाठी अर्ज करताना जन्मदाखला देणे अनिवार्य करण्यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे, महानगरपालिका किंवा जन्म-मृत्यू नोंदणी कायदा, १९६९ अंतर्गत कोणत्याही तत्सम प्राधिकरणाकडूनच जन्म दाखला वितरित केलेला असावा. विशेष म्हणजे १ ऑक्टोबर २०२३ पूर्वी जन्मलेल्या व्यक्तींना हा नियम लागू होत नाही. ते पूर्वीप्रमाणेच एसएससी बोर्ड सर्टिफिकेट, शाळा सोडल्याचा दाखला, पॅनकार्ड, वाहन चालक परवाना किंवा इतर तत्सम सरकारी ओळखपत्राचा पुरावा सादर करू शकतात.

निवासी पत्ता

आजवर पासपोर्टच्या शेवटच्या पानावर पासपोर्ट धारकाचा कायमचा पत्ता छापलेला असायचा. पण यापुढे शेवटच्या पानावर पत्ता छापला जाणार नाही. त्याऐवीज तिथे बारकोड छापला जाईल. इमिग्रेशन अधिकारी हा बारकोड स्कॅन करून पत्त्याबाबत माहिती मिळवू शकतील.

कलर कोडींग

यापुढे पासपोर्टचे कव्हर वेगवेगळ्या रंगाचे असेल. जेणेकरून त्याचे वर्गीकरण करणे सोपे जाईल. सरकारी अधिकाऱ्यांना पांढऱ्या रंगाचा पासपोर्ट दिला जाईल. तसेच मुत्सद्दी अधिकाऱ्यांना लाल रंगाचा पासपोर्ट दिला जाईल. दरम्यान सामान्य नागरिकांना पूर्वीप्रमाणेच निळ्या रंगातला पासपोर्ट मिळेल.

पालकांची नावे हटविणार

पासपोर्टच्या शेवटच्या पानावर छापले जाणारे पालकांचे नाव यापुढे छापले जाणार नाही. या बदलामुळे एकल पालक किंवा विभक्त कुटुंबांना दिलासा मिळणार नाही. त्यांना जाहीर करावी न लागणाऱ्या माहितीबाबत गोपनीयता राखता येणार आहे.

पासपोर्ट सेवा केंद्राची संख्या वाढवली

पासपोर्टसाठी अर्ज करणे, मजकूरात बदल करणे, अशी कामे पासपोर्ट सेवा केंद्राद्वारे केली जातात. आता ही केंद्रे वाढवली जाणार आहेत. पुढील पाच वर्षांत सेवा केंद्रांची संख्या ४४२ वरून ६00 केली जाणार आहे.

# अंबड तालुक्यातील खेडगाव व रोहीलागड येथे पाणलोट रथ यात्रा उत्साहात

**जालना | प्रतिनिधी -** प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.0 अंतर्गत केंद्र शासनाच्या भूसंसाधन विभाग व मृद व जलसंधारण विभाग व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तालुक्यात सकाळच्या सत्रात खेडगाव व दुपारच्या सत्रात रोहीलागड येथे पाणलोट रथ यात्रा उत्साहात संपन्न झाली.

सकाळी ९ वाजता खेडगाव येथे केंद्र शासनाच्या मोबाईल व्हॅनचे आगमन झाले. यावेळी उपविभागीय जलसंधारण अधिकारी ऋतुजा देसाई व खेडगावचे सरपंच शंकरराव गोडसे यांनी रथास हिरवी झेंडी दाखवून रथाचे स्वागत केले. त्यानंतर गावातील मुख्य चौकापासून ते ग्रामपंचायत कार्यालयापर्यंत रॅली काढण्यात आली. यामध्ये शाळेतील विद्यार्थी, महिला बचत गट प्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक जिल्हाधिकारी पुलकीत सिंग हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा जलसंधारण अधिकारी एस. एस. वाघमारे, चिकनगाव सरपंच रामदास खांडेभराड, जलसंधारण अधिकारी उदय माठे, विठ्ठल ढोबळे, सुशील बिरादार, अश्विनी खुणे, वैष्णवी निलपल्ले, संबंधित ग्रामसेवक, तलाठी, कृषि सहाय्यक, मुख्याध्यापक, शिक्षक, वन विभाग, उमेद , जलसंपदा,आत्मा, कृषि या विभागाचे अधिकारी व गावातील युवक, शेतकरी,महिला बचत गट सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जलतज्ञ राधेशाम राजपूत यांनी पाणलोट संकल्पना या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहिलगड पाणलोट समिती सचिव सतीश होलगे, शिवनाथ ठोके, भारत शिरसाठ, प्रियंका चांदवडे, राजेंद्र लोंढे व पाणलोट समिती खेडगाव यांनी परिश्रम घेतले.

यावेळी निबंध स्पर्धा ,रांगोळी स्पर्धा,मधील विजेते व पाणलोट योध्या व धारिणीताई यांना सहाय्यक जिल्हाधिकारी पुलकीत सिंग व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पाणलोट योजनेतून मंजूर असलेल्या सामूहिक शेततळे व फळबाग लागवड कामाचे भूमि पूजन करण्यात आले व योजनेतून पूर्ण झालेल्या सामुहिक शेततळ्याचे लोकार्पण करण्यात आले. श्रमदान व वृक्षारोपण यावेळी खेडगाव येथील शाळा परिसरात व रोहीलागड येथील वन परीक्षेत्रात श्रमदान करून वृक्षारोपण करण्यात आले. दरम्यान खेडगाव व रोहिलगड येथील उपस्थित ग्रामस्थ यांना मृद व जलसंवर्धनाची शपथ देण्यात आली. खेडगाव व रोहिलगड येथील कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर पाणलोट रथ नियोजनानुसार परभणी जिल्ह्यातील जिंतूरकडे रवाना करण्यात आला.

# जालना शासकीय जिल्हा रुग्णालयात राष्ट्रीय कर्णबधिर दिन साजरा

## वेळीच उपचारासाठी प्रशासनाकडून जनजागृती मोहिम

**जालना | प्रतिनिधी -** येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात गुरुवार (दि ६) रोजी दुपारी १२:३0 वाजता राष्ट्रीय कर्णबधिर दिन सप्ताह साजरा करण्यात आलाय. बाळ लहान असतं तेव्हा त्याला ऐकायला येत नाही मग आपण त्याला मुकबधिर म्हणतो. मात्र तो बधिर असल्याने तो मुक होतोय. त्यामुळं अशा लहान बाळावर रुग्णालयात वेळीच उपचार करावेत. जेणेकरून तो पुढे जाऊन मुकबधिर राहणार नाही. यासाठी प्रशासनाकडून जनजागृती मोहिम राबवण्यात येत आहे. आणि नागरिकांनीही डॉक्टरांकडून वेळीच तपासणी करून घ्यावी असं आवाहन देखील जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पाटील यांनी केलं आहे. जागतिक कर्णबधिरता दिन व सप्ताह राष्ट्रीय कर्णबधिर प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या वतीने ३ ते ८ मार्च दरम्यान साजरा केला जातोय. कर्णबधिरता सप्ताह निमित्त आज दुपारी १२ वाजता जिल्हा सामान्य रुग्णालयात तपासणी शिबीर घेण्यात आलय. शिबिरापूर्वी जनजागृतीपर रॅली काढण्यात आलीय. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ राजेंद्र पाटील, डॉ कीर्ती कऱ्हाडकर, डॉ प्रदीप कुलकर्णी, डॉ प्रशांत बांदल, डॉ संतोष राऊत, संतोष जायभाये यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कीर्ती कऱ्हाडकर,प्रियांका शिंदे, राम मोरे, यांनी अतोनात परिश्रम घेतले.

# ‘हमारा कॉलेज में जाना’ या म्युझिक व्हिडिओची सक्सेस पार्टी

हमारा कॉलेज में जाना या म्युझिक व्हिडिओच्या सक्सेस पार्टीमध्ये अनुप जलोटा यांनी त्याच्या टीमचा सन्मान केला. ९0 च्या दशकातील सुर आजही सर्वाधिक ऐकली जाणारी गाणी आहेत. त्या काळातील गाणी, संगीत आणि संभाषणांच्या आठवणींना उजाळा देणारा हमारा कॉलेज में जाना हा म्युझिक व्हिडिओ रेड रिबन म्युझिक कंपनीने रिलीज केला आहे आणि तो खूप लोकप्रिय होत आहे. या गाण्याच्या यशाचा आनंद मुंबईतील जुहू येथील हयात सेंट्रिक हॉटेलमध्ये साजरा करण्यात आला जिथे पद्मश्री अनुप जलोटा यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

हा म्युझिक व्हिडिओ मीती बग्गा यांनी लिहिला आणि गीतलेखित केला आहे, सुजाता त्रिवेदी यांनी संगीतबद्ध आणि गायला आहे, व्हिडिओ दिग्दर्शन विवेक प्रकाश यांनी केले आहे तर द्राक्ष शर्मा आणि अर्णब शर्मा या व्हिडिओमध्ये आहेत.

मीती बग्गा ही एक प्रसिद्ध फॅशन डिझायनर आहे पण तिची पेनही आता जादू पसरवत आहे. गीतकार म्हणून त्यांची काही गाणी आधीच प्रदर्शित झाली आहेत पण हे गाणे एका खास प्रकारच्या सुगंधाने आणि रोमान्सने भरलेले आहे.

या कार्यक्रमात संगीत व्हिडिओची निर्मिती देखील दाखवण्यात आली. अल्बमबद्दल एक प्रश्नमंजुषा घेण्यात आली जी खूपच मनोरंजक होती. हा म्युझिक व्हिडिओ दोनदा पडद्यावर दाखवण्यात आला ज्याचे सर्वांनी कौतुक केले आणि प्रेक्षक शुद्ध प्रेम आणि जादुई संगीतात हरवून गेले.

रेड रिबनचे एमडी ललित्य मुन्शा यांनी अनुप जलोटा यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी अनुप जलोटा यांनी मीती बग्गासह संपूर्ण




टीमचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी बिग बॉस १२ फेम गायक दीपक ठाकूर आणि रोली प्रकाश हे देखील उपस्थित होते. निमर्ती आणि गीतकार मीती बग्गा यांनी स्टेजवर कविता सादर करून सर्वांना आश्चर्यचकित केले. जेव्हा संगीतकार गायिका सुजाता त्रिवेदी यांनी हे गाणे तिच्या गोड आवाजात गायले तेव्हा सर्वजण त्याच्या आकर्षणात हरवून गेले. प्रेरणा गुप्ता यांनी त्यांच्या सूत्रसंचालनाने कार्यक्रम अधिक रंजक बनवला.

संगीतकार आणि गायक म्हणून स्वतःला आधीच सिद्ध केलेल्या विवेक प्रकाश यांनी या गाण्याचा व्हिडिओ देखील अतिशय सुंदर आणि परिपक्वपणे दिग्दर्शित केला आहे आणि गाण्यात लपलेला प्रणय अतिशय सहजतेने आणि सौंदर्याने सादर केला आहे.

नृत्यदिग्दर्शिका तान्या रवींद्रन यांनी त्यांच्या उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शनाने हे गाणे आणखी सजवले आहे.

रेड रिबनचे व्यवस्थापकीय संचालक ललित्य मुन्शा म्हणतात, रेड रिबनमध्ये, उत्कृष्ट संगीताचे प्रकाशन आणि प्रोत्साहन करण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. मला खात्री आहे की हमारा कॉलेज में जाना हा म्युझिक व्हिडिओ आणखी मोठे यश मिळवेल. आमच्या रेड रिबन म्युझिक यूट्यूब चॅनेलवर ते आत्ताच पहा आणि शेअर करा.

हमारा कॉलेज में जाना हे गाणे रेड रिबन एंटरटेनमेंटच्या अधिकृत चॅनेलवर प्रदर्शित झाले आहे आणि संगीत प्रेमींकडून त्याला अद्भुत प्रतिसाद मिळत आहे. हे गाणे श्रोते आणि प्रेक्षकांना १९९0 च्या दशकात घेऊन जाते. व्हिडिओ सुंदरपणे चित्रित केला आहे. द्राक्षा शर्मा खूपच गोंडस दिसते आणि संगीत व्हिडिओ खूप सुंदर दिसत आहे.

सन्माननीय पाहुणे अनुप जलोटा यांनी गाण्याच्या यशस्वी प्रकाशनाच्या उत्सवानिमित्त अल्बमशी संबंधित संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, निर्मात्या मीती बग्गा यांनी त्याचे बोल खूप सुंदर लिहिले आहेत जे हृदयाला स्पर्श करतात. या गाण्यात त्याने त्याचे कॉलेजचे अनुभव मांडले आहेत असे दिसते. सुजाता त्रिवेदी यांनी ते खूप छान संगीतबद्ध केले आहे आणि तितक्याच आवडीने गायले आहे. द्राक्ष आणि अर्णव शर्मा यांच्यातील केमिस्ट्री अद्भुत दिसते. हे गाणे आता अधिक लोकप्रिय होईल.

पान १ वरुन

## ज्ञानराधा मल्टिस्टेट ...

रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. बीड, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, पुण्यातील शाखांमधून ईडीने सुमारे ९५ कोटींची संपत्ती जप्त केली आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेटचे चेअरमन सुरेश कुटे यांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त केली आहे. या मालमत्तेची किंमत १४३३ कोटी ४८ लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी विधिमंडळात दिली.

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेटचे जालना, छत्रपती संभाजी नगर, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, बीड यासह राज्यात व राज्याबाहेर जाळे पसरलेले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात सुरेश आणि अर्चना कुटे यांच्या मालकीच्या २३८ मालमत्ता आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, पतसंस्थेत ठेवीदार आणि बचत खातेदारांचे एकूण ३ हजार ७१५ कोटी ५८ लाख ७२ हजार ६३३ रुपये अडकले आहेत. तर ईडीने आजपर्यंत अंदाजे १४३३ कोटी ४८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. या प्रकरणा संदर्भात गंभीर दखल घेत महाराष्ट्र सरकार पुढे काय कायदेशीर पाऊल उचलणार आहे या संदर्भात सर्व ठेवीदार गोरगरीब लोकांचे लक्ष लागले आहे. शासनाने हा मुद्दा अत्यंत गांभीर्याने घेणे अपेक्षित असून असे झाले नाही तर सर्वसामान्य गोरगरीब ठेवीदाराला आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय राहणार नाही या आत्महत्या वाचवायच्या असतील तर शासनाने वेळीच पाऊल उचलणं अपेक्षित आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी विधिमंडळात म्हणाले.

यावेळी राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, या सर्व पतसंस्था केंद्र सरकारच्या अधिकारात येतात परंतु असे असले तरी आमदार बबनराव लोणीकर यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट घोटाळ्यासंदर्भात सविस्तर अभ्यास केलेला असून अत्यंत पोट तिडकीने वारंवार प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न मांडला आहे त्यामुळे आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य व केंद्र सरकार मध्ये समन्वय साधून यासंदर्भात लवकरात लवकर गोरगरिबांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील राहील त्याचप्रमाणे केंद्र सरकारचे एक कार्यालय पुणे या ठिकाणी उभारण्यासंदर्भात देखील प्रयत्न केले जातील. या संदर्भात आमदार प्रकाश सोळंके यांनी जी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे आहे ती सरकारकडे नाही काय? असा सवाल करत सरकारने याबाबत अत्यंत गांभीर्यपूर्वक भूमिका घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या घोटाळ्या संदर्भात व सर्वसामान्यांचे अडकलेल्या पैशासंदर्भात आपण प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रश्न मांडलेले असून केवळ प्रत्येक अधिवेशनात प्रश्न मांडायचा आणि शासनाने परत परत तेच ते उत्तर द्यायचे असे किती दिवस चालणार असा सवाल आमदार बबनराव लोणीकर यांनी सरकारला विचारला. जर शासनाने या संदर्भात ठोस भूमिका घेतली नाही तर सर्वसामान्य नागरिक त्यांच्या मुलीचे लग्न कसे करणार मुलांची फीस कशी भरणार असे अनेक गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहतील व शेवटी आत्महत्येचा पर्याय त्यांना स्वीकारावा लागेल त्यामुळे ही बाब अत्यंत गंभीर असून या बाबीकडे शासनाने तातडीने व अत्यंत गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे असेही यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

## शिक्षण समृद्धी ...

काशिनाथ उखर्डे, विजय बंड, कणखर सर, गंगाराम आल्हाट, चव्हाण सर, यश महाविद्यालयाचे प्राचार्य जोशी सर, माधव शिंदे, केंद्रप्रमुख चिंधोटे सर, यांची आवर्जून उपस्थिती होती. कार्यक्रमांमध्ये प्रशिक्षणात त्या तर्फे सावता तिडके यांनी आपले मनोगत व्यक्त करतानाच प्रशिक्षणातील नवीन शैक्षणिक धोरणावरील सर्व तासिकांचा आवर्जून उल्लेख करतानाच तज्ञ मार्गदर्शक आणि योग्य मार्गदर्शन केल्याचे सुतवाच केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राठोड सर यांनी केले. प्रशिक्षणामध्ये २00 प्रशिक्षणार्थींनी या टप्प्यामध्ये प्रशिक्षण पूर्ण केले.

## भाजपाने जनादेश ...

जर माहिती होती तर कारवाई साठी ऐवढा उशिर का? हे रामराज्यच्या बाता मारतात, येथे अत्याचार, खुन, दरोड्याच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. सत्ता येते सत्ता जाते, मात्र, हे सरकार गुन्हेगारांना आश्रय देत आहे. हा गंभीर विषय आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी याची जबाबदारी घेत राजीनामा द्याव अशी मागणीही श्री चौधरी यांनी यावेळी केली.

कोणत्याही समाजाची आर्थिक व सामाजिक स्थितीची माहिती होण्यासाठी जनगणणा होणे आवश्यक असल्याचे श्री चौधरी यांनी म्हटले आहे.

# आर्थिक गुन्हे रोखण्यासाठी महाराष्ट्र इंटेलिजन्स युनिटची स्थापना - गृह राज्यमंत्री कदम

**मुंबई -** राज्यात आर्थिक गुंतवणुकीच्या व्यवहारासाठी येणाऱ्या कंपन्या खऱ्या आहेत की फसव्या हे तपासण्यासाठी व भविष्यात टोरेस कंपनीसारखे आर्थिक गुन्हे होऊ नयेत यासाठी महाराष्ट्र इंटेलिजेन्स युनिटची स्थापना करण्यात येणार असल्याची माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना राज्यमंत्री श्री. कदम बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये सदस्य मनीषा कायंदे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला. टोरेस प्रकरणी पोलीस प्रशासन योग्य कार्यवाही करत असल्याचे सांगून राज्यमंत्री श्री. कदम म्हणाले, याप्रकरणी आतापर्यंत ७ जणांना अटक करण्यात आली असून १६ हजार ७८६ जणांची सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तर याप्रकरणी ४९ कोटी २ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. हे प्रकरण न्याय प्रविष्ठ असून न्यायालयाच्या निर्देशानुसार गुंतवणुकदारांचे पैसे परत करण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे. या हस्तगत केलेल्या मुद्देमालाचा लिलाव करण्यात येतो आणि त्यातून विहित नियमांनुसार गुंतवणुकदारांना पैसे परत केले जातात. त्यानुसार आर्थिक गुन्हे कायद्यानुसार कारवाई करण्यात येत आहे. उर्वरीत वसुलीसाठी कंपनीच्या सर्व मालमत्ता जप्त करण्यात येतील. तसेच या मालमत्तांमधूनही वसुली न झाल्यास कंपनी संचालकांच्या इतर ठिकाणी असलेल्या मालमत्तांवर कारवाई करण्यात येईल. याप्रकरणी शासन कडक कारवाई करेल अशी माहिती राज्यमंत्री श्री. कदम यांनी दिली.

# सिंधीकाळेगाव परिसरात गहु, ज्वारी, हरभरा काढणीला वेग



**सिंधीकाळेगाव । प्रतिनिधी** - जालना तालुक्यातील सिंधीकाळेगाव परिसरातील रब्बी हंगामातील ज्वारी व हरभरा पिकाच्या काढणीस सुरुवात झाली. पिक काढण्याच्या सुरुवातीला शेतकऱ्यांना मजुरांच्या टंचाईचा प्रश्न भेडसावत होता. त्यातच मजुरांच्या मजुरीचा दरही गगनाला भिडला होता. त्यामुळे मजुरांना वाढीव दर देत ज्वारी व हरभरा काढण्याचे काम सुरु असल्याचे चित्र तर काही ठिकाणी काढणी झालेल्या पिकाची ट्रॅक्टरला जोडण्यात आलेल्या मळणीयंत्र मशीनच्या साहाय्याने करतानाचे चित्र पहायला मिळाले. गहु,हरभरा,मका,ज्वारीची पेरणी शेतकऱ्यांनी केली परिसरातील गहु,ज्वारी,हरभरा,मका काढणी व मळणीयत्राला सुरूवात झाली आहे. अवकालीच्या तडाख्यात सापडण्या अगोदर ज्वारी मळणी यंत्राने काढणी करीत आहे.

# जालन्यात मारामाऱ्या, हल्ल्यांच्या घटनेत वाढ

## सामाजिक कार्यकर्ते गणेश लुटे यांच्यावर जवाहर बाग परिसरात जीवघेणा हल्ला

**जालना । प्रतिनिधी** - जालन्याचा बीड होतोय काय असा संतप्त सवाल कालच माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी उपस्थित केला होता. मागील काही दिवसांपासून जालना जिल्ह्यामध्ये मारामाऱ्या तसेच हल्ल्यांच्या घटनांमध्ये चांगलीच वाढ झाली असल्याचे दिसून येत आहे.भोकरदन तालुक्यातील अन्वा येथे गरम राडचे चटके देण्याची घटना तसेच अहंकार देऊळगाव येथील दोन सख्ख्या भावांवर झालेला हल्ला या घटना ताज्या असतानाच जालना शहरातील कन्हैया नगर येथील रहिवासी सामाजिक कार्यकर्ते गणेश लुटे यांच्यावर बुधवार (दि ५) रोजी सकाळी दहा वाजता जव्हार बाग परिसरात जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे.

चाकुचा धाक दाखवत बेदम मारहाण झाल्याची घटना घडलीये. गणेश उत्तरराव लोटे असं मारहाणीत जखमी झालेल्या सामाजिक कार्यकर्त्याचे नाव आहे. काही वर्षांपूर्वीचं भूमिअभिलेखमध्ये जागेच्या फेर रोखल्यानं त्यांना ही मारहाण करण्यात आली आहे.

या घटनांमुळे जालनाचा बीड होतो की काय अशी भीती आता जिल्हावासीयांना सतावत आहे.

भूमी अभिलेख मधील फेर का रोखले असे विचारत गणेश लुटे यांच्यावर महेश भुरेवाल आणि पवन भुरेवाल यांनी गळ्याला चाकू लावला आणि जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप आज दिनांक ६ गुरुवार रोजी दुपारी दोन वाजता गणेश लुटे यांनी केला आहे.

या हल्लयात गणेश लोटे यांच्या डोक्यावर व हातावर गंभीर मार लागले आहे

सुभाष क्षीरसागर यांच्या जमिनीचे फेरफार चे प्रकरण कोर्टात मागील पंधरा वर्षापासून कोर्टामध्ये प्रलंबित आहे या प्रकरणाचा राग मनात धरून महेश भुरेवाल आणि पवन भुरेवाल यांनी पाठीमागून येऊन अचानक जीवघेणा हल्ला केला असल्याचा आरोप गणेश लुटे यांनी केला आहे. गणेश लुटे हे सध्या शासकीय सामान्य रुग्णालयामध्ये आयसीयू मध्ये उपचार घेत असून भूमी अभिलेख येथील कोर्टात प्रलंबित असलेले प्रकरण निपटून घे नाहीतर तुला कापून टाकेल असाशी धमकी दिल्याचा आरोप गणेश लुटे यांनी केला आहे. या प्रकरणात सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर बाजार पोलीस पुढील तपास करीत आहे.





काँग्रेस चे राज्य प्रभारी कुणाल चौधरी हे जालन्यात एका बैठकी साठी आले असता त्यांचा शॉल पुष्प गुच्छ देऊन सत्कार करतांना जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, खा कल्याण काळे, माजी आ कैलास गोरंट्याल, अनिल मुंढे आदी. (छाया/जावेद तंबोली)

## 'त्या' रस्त्यासाठी आमरण उपोषणाचा इशारा

**मंठा । प्रतिनिधी** - सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आधिनिस्त मंठा ते उस्वद रोडचे खड्डे बुजवण्याचे काम थातूरमातूर पद्धतीने झाले असताना निवेदक यांनी वारंवार सूचना देऊनही पाठपुरावा करूनही सदर रस्त्याचे काम योग्य पद्धतीने झाले नसल्याने दि ७ मार्च रोजी आमरण उपोषणाचा इशारा दिला. ऍडजस्टमेंट वर होत असलेल्या या कामाची कुठलीही माहिती टेंडर इस्टिमेट नसल्याने माहितीचा अभाव धातुर्मातुर पद्धतीने खड्डे बुजवण्याचे काम कुठल्या निकष वर झाले या भ्रष्ट आणि भ्रष्टाचार निवेदन देऊनही कुठले समाधान न झाल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेना मंठा शहराध्यक्ष गजानन माळकर यांनी अभियंता संभाजीनगर यांच्यासह महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांना मेलद्वारे कळवुन लोकशाही मार्गाचा अवलंब करण्याचा इशारा दिला..

# रोटरी मिसेस आरोग्यवती स्पर्धेस महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी** - रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त घेण्यात येणाऱ्या रोटरी मिसेस आरोग्यवती स्पर्धेला उदंड प्रतिसाद मिळत आहे.




आरोग्याची दक्षता घेण्यासाठी व त्यांच्या आरोग्याची सवलतीच्या दरात तपासणी करण्यासाठी महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला आहे. गुरुवार दि. ६ मार्च या स्पर्धेदरम्यान तपासणीचा पहिला दिवस होता. शहरातील विविध हॉस्पिटलमध्ये महिलांची महत्त्वपूर्ण तपासणी माफक व व सवलतीच्या दरात केली जात आहे. याद्वारे ज्या महिला तंदुरुस्त व शारीरिकदृष्ट्या निरोगी आहेत, त्यांची तीन गटात विभागणी करून पुरस्कार देण्यात येणार आहे. या स्पर्धेचे आणखी दोन दिवस बाकी असून यामध्ये जास्तीत जास्त महिलांनी सहभाग नोंदवून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन क्लबचे अध्यक्ष महेश माळी, सचिव गौरव करवा, प्रकल्प प्रमुख नेहा पाटनी, आरती भक्कड आणि डॉ. ममता मुंदडा यांनी केले आहे.

# देवमूर्तीच्या गट नं. २३६ मध्ये आकडेवाले फुल; मीटरवाले गुल!

## डीपीचा संपूर्ण खेळखंडोबा;एमएससीबीला निवेदन देऊनही फायदा नाही!

**जालना । प्रतिनिधी** - येथील देवमूर्ती परिसरात येत असलेल्या मंठा रोडवरील साई हिल्स नामक कॉलनीमध्ये (गट नं. २३६) गेल्या अनेक वर्षापासून एक डीपी असून सदर डीपीवर भार वाढल्याने ती केव्हाही जळू शकते. विशेष म्हणजे या ठिकाणी काहींचे आरो प्लॅट आहेत, पीठाच्या गिरण्या आहेत, घरगुती वापराचे कनेक्शन सुध्दा आहे परंतू हे सर्व कशावर चालते तर ते आकड्यांवर चालते. त्यामुळे सहाजिकच ज्यांच्याकडे अधिकृत मीटर आहेत, अशी मंडळी अडचणीत सापडली आहे.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, येथील मंठा रोडवर चौधरीनगरच्या पुढे असलेला भाग म्हणजे साई हिल्स् कॉलनी! या कॉलनीत जवळपास चाळीसहून अधिक कुटूंबे राहतात. या ठिकाणी जवळपास वीस मीटर आहेत. बहुतांशी लोक हे आकड्यांच्या वापर करतांना दिसून येतात. या संदर्भात एमएससीबीच्या कन्हैयानगर कार्यालयाला दोन वेळा निवेदन देण्यात आले परंतू त्याच्या काहीही फायदा झाला नाही. विविश म्हणजे २०२० मध्येच काही लोकांनी वर्गणी गोळा करुन डीपी आणली आणि पुढे चालून याठिकाणी रहिवांशांची संख्या सुध्दा वाढली. परंतू आता सदर डीपीवर लोड येवू लागला आहे.

या ठिकाणी एमएसईबीचा कोण लाईनमन आहे, तो केव्हा येतो आणि केव्हा जातो, हे देखील रहिवाशांना माहित नाही. येथील संपूर्ण कारभार हा रामभरोसे असाच आहे. वीजेची काही अडचण आल्यास ती वर्गणी गोळा करुनच खाजगी व्यक्तीमार्फत करुन घेण्यात येते. परंतू वारंवार पैसे द्यायलाही लोक कंटाळले आहेत.

मीटर घेऊन फायदा काय?


या कॉलनीतील लोक सरळ- सरळ म्हणतात की, आमचा मीटर घेऊन फायदा काय? केवळ एमएसईबीचे बील भरण्यासाठीच का? त्यापेक्षा ज्यांच्याकडे मीटर नाहीत, अशी मंडळीच बरे आहेत. कारण त्यांच्याकडे कोणी फिरकत नाही आणि बील भरण्याचीही कटकट नाही! काहींनी तर चक्क दुसर्याच्या नावावरील मीटर आपल्या घराला ठोकून दिले आहेत. तेथे फक्त मीटर आहे, एवढेच दिसते, बाकी सर्व अलबेल! खरा प्रश्न तो मीटरवाल्याचा! काहींची मानसिकता ही आता मीटर नको, अशीच होतांना दिसत आहे, त्यामुळे तेही बील भरायला धजत नाही किंवा त्यांनीही अन्य मार्गाचा अवलंब करण्यास प्रारंभ केला आहे.

**दुहेरी अडचण!**

मीटर चालकांची दुहेरी अडचण झाली आहे. एक तर मीटर घेतले हे चुकलेच! असेच मत अनेकांचे बनले आहे. तर दुसरीकडे प्रत्येक महिन्याला न चुकता बीलाचा भरणा करवा लागतो. अशा दुहेरी संकटात मीटरवाले सापडले आहेत.

यावर एकच पर्याय आहे तो म्हणजे एमएसईबी! परंतू या कार्यालयातील अधिकारीही दिन जाव पगार आव या भुमीकेत वावरत असून त्यांना मस्तपैकी एसीची हवा मिळते. अशावेळी कुणी निवेदन दिले काय! कुणी विनंत्या केल्या काय! त्यांना काहीहीी देणे नाही, असेच ते वावतांना दिसतात.

## राष्ट्रीय बंजारा परिषद जिल्हाउपाध्यक्षपदी संतोष चव्हाण



**जालना । प्रतिनिधी** - जालना तालुक्यातील उखळी शिवनगर येथील सरपंच संतोष चव्हाण यांची राष्ट्रीय बंजारा परिषद जिल्हाउपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. नियुक्ती पत्र देतांना राष्ट्रीय बंजारा परिषदेचे जालना जिल्हा अध्यक्ष राजेश पवार,यावेळी युवासेना जिल्हाध्यक्ष शिवाजी शेजुळ, माजी पंचायत समिती सदस्य महादेव घेंबड, सरपंच सुशिल तौर,पंढरीनाथजी शिंदे, युवाजिल्हा उपाध्यक्ष अनिल पवार आदींची उपस्थिती होती.

## अभिनेते मकरंद अनासपुरे यांना स्व. बाबासाहेब आकात स्मृती पुरस्कार जाहीर

**परतूर । प्रतिनिधी** - शिक्षण तथा सहकार महर्षी स्व. बाबासाहेब भाऊ आकात यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा स्व. बाबासाहेब भाऊ आकात स्मृती पुरस्कार प्रसिद्ध चित्रपट अभिनेते तथा मराठवाड्याचे भूमिपुत्र मकरंद अनासपुरे यांना जाहीर झाला आहे.येत्या रविवारी दि. ९ भाऊंच्या जयंती दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते हा पुरस्कार अनासपुरे यांना प्रदान करण्यात येणार आहे.मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य कपील आकात हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार असल्याची माहिती समन्वय समितीच्या वतीने बुधवारी दि. ५ आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.



या पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक प्रा. डॉ. रणजितसिंह निंबाळकर,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. दासू वैद्य,विद्यापीठ व्यवस्थापन समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. भागवत कटारे,प्राचार्य डॉ. शिवाजी मदन हे उपस्थित राहणार आहेत.

तर यावेळी मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. कुणाल आकात,विद्यापीठाचे रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. भास्कर साठे, विद्यापीठ अधिसभा सदस्य प्रा. डॉ. मुंजा धोंडगे यांचीही कार्यक्रमाला विशेष उपस्थिती असणार आहे.

येत्या रविवारी दि. ९ मार्च रोजी सकाळी १० वाजता परतूर येथील लालबहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालयाच्या स्व. बाबासाहेब भाऊ आकात सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती संयोजन समितीचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे,प्राचार्य डॉ. माणिकराव थिटे,डॉ. सुधाकर जाधव,मुख्याध्यापक एल. के. बिरादार,शेषराव वायाळ, राजेश नवल यांनी दिली. दरम्यान, पुरस्काराचे हे तिसरे वर्षे असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येच्या निषेधार्थ जाफराबादेत कडकडीत बंद

## व्यापाऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद

**जाफराबाद । प्रतिनिधी** - स्व. संतोष देशमुख यांच्या सर्व मारेकऱ्यांना तात्काळ फाशीची शिक्षा व्हावी या प्रमुख मागणीसाठी सकल मराठा समाज जाफराबाद तालुका व सर्वधर्मीयांच्या वतीने जाफराबाद येथे ता. ५ रोजी कडकडीत बंद पुकारण्यात आला होता. सकाळी ७ वाजेपासून येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समाज बांधव मोठ्या संख्येने जमून धनंजय मुंडे, वाल्मीक कराड व सरकार विरोधात निषेधाच्या घोषणा देत होते. सकाळी ८ वाजेपासून शहरातील मुख्य रस्त्याने सर्व समाज बांधवांनी मिरवणूक काढत विविध घोषणा देत शहरातील सर्व बाजारपेठ कडकडीत बंद ठेवली. शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी आपापली प्रतिष्ठाने बंद ठेवत उत्स्फूर्तपणे या बंदला प्रतिसाद देत बंद मध्ये सहभागी झाले. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री विरोधी पक्षनेते यांना पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे व नायब तहसीलदार मंगेश साबळे यांच्या मार्फत प्रमुख मागण्याचे लेखी निवेदन देण्यात आले. या निवेदनातून स्व. संतोष देशमुख यांना ज्या अमानवीय पद्धतीने मारहाण करून त्यांच्या छळ करण्यात आला आणि त्याचे व्हिडिओ आणि फोटो सोशल माध्यमावर प्रसिद्ध होताच सर्वत्र अतिशय तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे. सदरील हत्या करत असताना आरोपींचा तो व्हिडिओ कॉल कुणाला चालू होता याची तत्काळ सखोल चौकशी करून त्यांनाही यामध्ये आरोपी करण्यात यावं. या प्रकरणातील राक्षसी वृत्तीच्या सर्व आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्यात यावे. त्याचबरोबर धनंजय मुंडे यांना या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड व इतर आरोपींना राजाश्रय दिल्याने सहआरोपी करण्यात यावे. मुख्य आरोपींची सर्व संपत्ती जप्त करण्यात यावी. फरार आरोपी कृष्णा आंधळे याचा तात्काळ शोध घ्यावा. सर्व समाजाच्या तीव्र संतप्त भावना लक्षात घेऊन स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय देण्यासाठी आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा द्यावी या मागण्या करण्यात आल्या आहेत. या बंद मध्ये सकल मराठा समाज व सर्वधर्मीय समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होते.



# बांधकाम परवानगी व लेआउट मंजुरीसाठी आता एक खडकी योजना कार्यान्वित होणार

## जालना क्रेडाईच्या कार्यक्रमात जिल्हा नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक सुमेध खरवडकर यांची माहिती

**जालना | प्रतिनिधी -** बांधकाम व्यावसायिक , अभियंत्यांना आवश्यक असणाऱ्या बांधकाम परवानग्या आणि लेआउट मंजुरीची प्रक्रिया गतिमान करण्यासह या प्रक्रियेतील अडचणी दूर करण्यासाठी १५ मार्चपासून एक खिडकी योजना कार्यान्वित केली जाणार असल्याची माहिती जिल्हा नगर रचना विभागाचे सहाय्यक संचालक सुमेध खरवडकर यांनी येथे बोलताना दिली.

नगररचना आणि स्थापत्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अभियंता आणि अधिकाऱ्यांना रायगड किल्ल्याचे निर्माते हिरोजी इंदुलकर यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा यंदाचा स्वराज्य अभियंता हिरोजी इंदलकर पुरस्कार नगररचना सहाय्यक संचालक सुमेध खरवाडकर यांना प्रदान करण्यात आल्याबद्दल जालना क्रेडाईतर्फे त्यांचा बुधवार दि. ५ मार्च रोजी सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्यांनी कार्यान्वित केल्या जाणाऱ्या एक खिडकी योजनेची माहिती दिली. प्रारंभी जालना क्रेडाईचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, माजी अध्यक्ष संजय मुथा, उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, सचिव अविनाश भोसले यांनी श्री. खरवडकर यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. याप्रसंगी उपस्थित असलेले नगर रचनाकार अंगद, मोराळे, महापालिकेचे सहाय्यक नगररचनाकार श्रीकांत गीते, रोहित घोरपडे, श्रीमती तेजस्वी शिंदे, धनंजय वसु, रुपेश मापारी यांचाही सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी श्री. खरवडकर पुढे म्हणाले की, एक खडकी योजनेमुळे आता कोणत्याही परवानग्यांसाठी अनेक टेबलवर जाण्याचे आवश्यकता राहणार नाही. एका ठिकाणी ही सर्व प्रक्रिया केली जाणार असल्याने, कामे विनाविलंब आणि आणि गतिमान होतील. समन्वयासाठी जालना क्रेडाईने पाच सदस्य समिती गठीत करावी, असे त्यांनी सुचविले. प्रारंभी त्यांनी बांधकाम व्यावसायिकांच्या समस्या आणि अडचणी जाणून घेतल्या. परिपूर्ण प्रस्ताव नसणे, अस्पष्ट दस्तऐवज अपलोड करणे, काही कागदपत्रांची पूर्तता नसणे यामुळे मंजुरी देण्यात विलंब होतो. मात्र, आता एक खिडकी योजनेमुळे सर्व अडचणी दूर होतील आणि ही प्रक्रिया गतिमान होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



प्रास्ताविकपर भाषणात अभय कुलकर्णी म्हणाले की, श्री. खरवडकर यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळणे म्हणजे जालना जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. बांधकाम व्यवसाय हा सरकारला उत्पन्न तर हाताला काम देणारा व्यवसाय आहे. अनेक चढउतार, अडचणीचा सामना करावा लागतो. मात्र आपण सर्वांनी हातात हात घालून काम केले तर अडचणी दूर होतात, त्यामुळेच अधिकाऱ्यांसमवेत संवादाला आम्ही प्राधान्य दिल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी शरद जयस्वाल, रवींद्र हुसे, चेतन मराठे, रितेश मंत्री यांच्यासह जालना क्रेडाईचे सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. विठ्ठल पवार यांनी केले.

# कबड्डी असोसिएशनच्यावतीने स्पर्धा २०२५ चे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** निवड चाचणी स्पर्धा २०२५' महाराष्ट्र राज्य वरिष्ठ व वरिष्ठ गट पुरुष व महिलाच्या स्पर्धा महाराष्ट्र राज्य वरिष्ठ गट (पुरुष व महिला ) च्या स्पर्धेमध्ये १९ ते २३ मार्च २०२५ विश्वास सामाजिक संस्था, ठाणे येथे घेण्याचे असोसिएशनने निश्चित केले आहे. या स्पर्धेसाठी जालना जिल्ह्याचा कबड्डी संघ वरिष्ठ गट (पुरुष व महिला) संघ निवडण्यासाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या निवड चाचणीसाठी पुरुष खेळाडू वजन ८५ किलो, महिला खेळाडू वजन ७५ किलो असावे असा निकष पूर्ण करणार्या खेळाडूंना स्पर्धेमध्ये सहभाग घेता येईल. स्पर्धेसाठी आवश्यक आधार कार्ड, जन्माचा दाखला याशिवाय खेळाडूंना स्पर्धेमध्ये भाग घेता येणार नाही. तरी सर्व संघाच्या व्यवस्थापकांनी आपल्या संघाची नोंदणी राहुल वाहूळे : ९८२३७७५८०२ बाबासाहेब मंडाळे ९८२३६६१८६१ यांच्याकडे करावी. या स्पर्धेचे ठिकाण जिल्हा परिषद शाळा, पिरपिंपळगाव राजूर रोड, ता. जालना असून ही स्पर्धा ०९ मार्च २०२५ रोजी सकाळी ९ वाजता सुरुवात होणार आहे. उशीरा आलेल्या संघाचा विचार केला जाणार नाही याची नोंद संघ व्यवस्थापकांनी घेऊन वेळेवर नोंद करून सहकार्य करावे. स्पर्धेसाठी मुला मुलींच्या संघासाठी २०० रुपये नोंदणी फी आकारण्यात येईल. याची नोंद घ्यावी, असे आवाहन कबड्डी असोसिएशनचे घनश्यामसेठ गोयल, अशोक पांगारकर, अक्षय गोरंट्याल, प्रशांत तेलगड, डॉ. अशोक हजारे, नंदकिशोर खर्डेकर, डॉ. देवेश पाथ्रीकर, माधवी काळे, राहुल वाहुळे, बाबासाहेब मंडळे, रामदास निहाळ यांनी केले आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.